# भा.कृ.अनु.प.—केंद्रीय कापूस संशोधन संस्था, नागपूर

## कापसाच्या लागवडीसाठी २८ डिसेंबर ते ३ जानेवारी २०१६ या कालावधीसाठी आठवडी सल्ला

‘‘हा सल्ला राज्यातील कृषी विद्यापीठाकडून प्राप्त माहितीवर आधारित आहे’’

### हवामानासंबंधी सल्ला

| | **सल्ला — २८ डिसेंबर ते ३ जानेवारी २०१६** |
|---|---|
| **महाराष्ट्र** | |
| नागपूर,<br>वर्धा,<br>चंद्रपूर,<br>यवतमाळ,<br>अमरावती,<br>अकोला,<br>बुलढाणा,<br>परभणी,<br>नांदेड,<br>बीड,<br>वाशिम,<br>धुळे,<br>जळगांव,<br>जालना,<br>औरंगाबाद | कापसाला योग्य मोबदला मिळण्यसाठी कापसाची स्वच्छ वेचणी करणे आवश्यक आहे. वेचणी लवकरात लवकर करणे आवश्यक आहे. पिकांची अदलाबदली करणे गरजेचे आहे कारण त्यामुळे किडयांची जीवनप्रक्रियामध्ये अडथळा निर्माण होतो व त्यामुळे किडयांचे नियंत्रण करण्यास सोपे जाते. कापसाची वेचणी स्वच्छ पिशवीमध्ये करणे गरजेचे आहे. कापूस साठवण्यासाठी गोणपाटाची पिशवी वापरणे टाळावे. कापसाचे तुकडे, तसेच किडीने ग्रासलेल्या कापसाच्या बियाण्यांची साठवण करू नये. कापसाच्या तुकडयांचे कंपोस्ट खत करावे व ते जाळू नये. |